# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक**

**महत्वाचे / तातडीचे**

**महा डी.बी.टी. संकेतस्थळाची अद्ययावत माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.**

राज्य शासनातर्फे चालू शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यांत येणाऱ्या महा डी.बी.टी. संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती योजना व सवलतींचे अर्ज विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. महा डी.बी.टी. संकेतस्थळावरील कार्यप्रणाली संबंधी माहिती देण्यासाठी मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग यांनी दि. ०४/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री. शाहू मंदिर महाविद्यालय लक्ष्मीनगर, पर्वती पायथा, पर्वत रमणा, पुणे–४११००९ येथे कार्यशाळा आयोजित करण्यात केलेली आहे. महाविद्यालयातील शिष्यवृत्ती संबंधीत कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सदर कार्यशाळेस उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सोबत शासन पत्र दि. ०१/०९/२०१७ ची पत्र जोडत आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासनाने आयोजित केलेल्या वरील कार्यशाळेस उपस्थित रहावे.

गणेशखिंड, पुणे–४११ ००७ )<br>
संदर्भ क्र.: शै.प्रवेश/३१९२ )<br>
दिनांक : ०१/०९/२०१७ )

उपकुलसचिव,<br>
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :<br>
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Dekstop: \Prakash Natikar:\ Marathi Letter

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१**

E-mail – jdhepune@gmail.com
Website: www.jdhepune.org
दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२० - २६०५१६३२

जा.क्र.शि.ससं/उशि/पुवि/सेनिवे/२०१७-१८/2051 दिनांक – ०१-९-२०१७

**कालमर्यादित- कार्यशाळा - ०४-९-२०१७**

**महत्वाचे-**

प्रति,

प्राचार्य, प्राचार्या
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना-अनुदानित
कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालये
पुणे, अहमदनगर नाशिक जिल्हा

**विषय - महा. डी. बी..टी. संकेतस्थळाची अद्ययावत माहिती देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन राज्य शासनातर्फे चालू शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यांत येणा-या शिष्यवृत्ती योजना व सवलतींचे अर्ज विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. सर्व पात्रताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेसाठी च्या संकेतस्थळावर सर्व महाविद्यालयांची नोंद होणे, विद्यार्थ्यांनी फॉर्म भरण्यासंबंधीत आणि फॉर्म मंजूरीसंबंधी कार्यवाही याची सर्व प्रणाली माहिती होणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित महाविद्यालयातील शिष्यवृत्तीचे कामकाज करण्या-या कर्मचा-यांकरिता कार्यशाळा **श्री शाहू मंदिर महाविद्यालय लक्ष्मीनगर, पर्वती पायथा, पर्वत रमणा, पुणे ४११००९ येथे दिनांक ०४-९-२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यांत आलेली असून सदर कार्यशाळेस सर्व महाविद्यालयीन शिष्यवृत्तीशी संबंधीत कामकाज करणारे कर्मचा-यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.**

सदर महा डी.बी.टी. संकेतस्थळावरील कार्यप्रणाली संबंधीत अद्ययावत माहिती देण्यांत येणार असल्याने, तसेच प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यांत येणार असल्याने कोणत्याही महाविद्यालयीन कर्मचा-याने अनुपस्थित राहू नये. कोणताही महाविद्यालयीन विद्यार्थी महा डी.बी.टी. वरील शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही, याची सर्व महाविद्यालयांनी / संस्थांनी गांभीर्यपूर्वक दक्षता घ्यावी.

**सहसंचालक, उच्च शिक्षण**
**पुणे विभाग, पुणे – १ करिता**

प्रत -

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे – १ यांना माहितीसाठी सादर
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था पुणे
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्य शास्त्र संस्था पुणे
६. प्राचार्य, तंत्र निकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था
७. प्राचार्य वैद्यकीय महाविद्यालये

Pension